**दारिद्र्यरेषेखाली धडपडणारा अन्नदाता – आणि त्याचे भविष्य**

सह्याद्रीतल्या शेतीची आणि त्यावर अवलंबित शेतकऱ्याची ही दुरवस्था अगदी स्पष्ट शब्दात, कृषी विद्यापीठांतील तज्ञ आणि धोरणकर्ते राजकारणी यांनी केलेलं अक्षम्य दुर्लक्ष आणि कसलाही अभ्यास न करता सरसकट लागू केलेली धोरणं यांचा परिणाम आहे. डोंगरातला शेतकरी आता दुष्टचक्रात अडकला आहे. 'शेती परवडत नाही' हे त्याचं ब्रीदवाक्य झालं आहे. काहीतरी 'विकासाचा' महाकाय प्रकल्प, किमान रस्ता वगैरे आपल्या जमिनीतून गेला की एकरकमी भरपूर पैसे मिळतील या एका आशेवर बहुसंख्य शेतकरी दिवस कुंठत आहेत. दारिद्र्य रेषेखालील जनतेसाठी असलेले रेशन कार्ड हा अन्नदात्या शेतकऱ्याचा सर्वात महत्वाचा आधार झाला आहे, यातच आपल्या संपूर्ण व्यवस्थेचं अपयश सिध्द होतं.

सध्याची धोरणं आणि शेती पद्धती अशीच सुरु राहिली तर अजून काही वर्षांनंतरची सह्याद्रीतल्या शेतकर्याची परिस्थिती कशी असेल?

आताची कर्ती पिढी थकायला लागेल तशी शेती ओस पडू लागणार आहे, कारण तरुण पिढी शेतीपासून पूर्ण तुटत चालली आहे. शहरात तग धरायची धडपड सुरु असताना गावी येऊन शेतीचा बुडता धंदा हातात घ्यायला कोणीही उत्सुक असणार नाहीत. आणि अजून एक भयानक वास्तव म्हणजे जरी कोणी शहरातून अर्धवट वयात येऊन शेती हातात घेतलीच, तरी ती त्याला कितपत जमेल ही मोठी शंका आहे. शेतीपासून अनेक वर्ष दूर राहिलेल्या, आणि शेतीचे विज्ञान, अर्थशास्त्र या सगळ्याचा कसलाही अभ्यास किवा चिंतन नसलेल्या व्यक्तीने सहज सुरु करून फायदेशीर करावा इतका हा फालतू विषय नाही. सगळ्याच शेतजमिनी अर्थातच विकल्या जाऊ शकणार नाहीत. शहराजवळच्या, किवा नवीन विकासाच्या कक्षेत असलेल्या ज्या जमिनी विकल्या जातील त्या शेती सोडून इतर प्रकल्प आणि 'विकासा'च्या कामांसाठी वापरल्या जातील.

वृक्षसंपदा संपल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण घटत जाऊन भूजल पातळी खोलवर जाईल. विहिरी, बोअर दरवर्षी अजून लवकर आटून जातील. पावसाचं पाणी जमिनीत मुरण्याऐवजी भूपृष्ठावरून अतिशय वेगात वाहून जाईल आणि माती धुपून जाईल. दगड उघडे पडले की ते क्रशर वर फोडून बांधकामासाठी खडी आणि वाळू बनवण्याच्या कमी येतील.

उजाड उतारांवरून धुपून वाहून आलेली माती धरणांमध्ये साठत चालली आहे, यावर कसलीच चर्चा, संशोधन किवा कृती होत नाही. परिणाम मात्र उघड दिसत आहेत... भर पावसाळ्यात धरणे भरू लागतात, तेव्हा त्यांचे दरवाजे उघडून विसर्ग सुरु होतो, पण त्याच वेळेस खाली लाभक्षेत्रात देखील हंगामी पाऊस जोमात असतो. मग नद्यांना पूर, नदीकाठच्या शहरांमध्ये आणि गावांमध्ये वाताहात, तुटपुंजी नुकसानभरपाई आणि राजकीय दोषारोप... हा वार्षिक कार्यक्रम सुरु झाला आहे, तो दिवसेंदिवस अधिक तीव्र स्वरूपाचा होत जाईल.

कालांतराने पाऊसाचं प्रमाण देखील कमी होऊ शकेल. पाऊस पडण्याचा कालावधी आणि पावसाचे दिवस अनिश्चित होत चाललेच आहेत. जागतिक हवामान बदल आणि स्थानिक पर्यावरणाचा ऱ्हास अश्या दोन्ही बाबींमुळे हजारो वर्षांपासून माहिती असलेलं अनुभवसिध्द शेतीचं वेळापत्रक पुरते विस्कटून जाईल. कमालीची अनिश्चितता वाढल्यामुळे शेती व्यवसायातली जोखीम अजून कैक पटींनी वाढेल.

जसा वन्य पशुपक्ष्यांचा आसरा नष्ट होईल, तसे ते अजून संख्येने आपल्या शेतांवर हल्ला चढवतील. मांसाहारी प्राण्यांना सुद्धा नाईलाजास्तव मानवी वस्त्यांमध्ये घुसून पाळीव प्राणी आणि प्रसंगी माणसांवर हल्ले करून गुजराण करावी लागेल.

झाडोरा नष्ट केल्यामुळे दरडी कोसळण्याचं, अचानक पूर येण्याचं प्रमाण वाढेल आणि डोंगरात राहणाऱ्यांना शेती तर सोडा, स्वतःचे जीव आणि घरदार वाचवण्यासाठी धडपड करावी लागेल. कोकणात आता दर वर्षी अश्या घटना सुरु झाल्या आहेत.

सह्याद्रीतील हे दुष्टचक्र फक्त एकाच चुकीमुळे सुरु झालं आहे – डोंगरावरच्या जंगलाचा विध्वंस. माणसाने निसर्गाचे रक्षण आणि संवर्धन कशासाठी करावे? केवळ सहली, पर्यटन यासाठी? मुळात माणूस पर्यावरणाचे संरक्षण करतो की पर्यावरण माणसाला सांभाळते? माणूस निसर्गाला वाचवू शकतो? की निसर्गातच फक्त माणसाला वाचवायची आणि जगवायची क्षमता आहे? ज्यांना अंगाखांद्यावर खेळवलं, वाढवलं, शिकवलं त्यांनीच शरीराची चाळण करून टाकली आहे. आज सह्याद्रीची अवस्था महाभारतात बाणांच्या शय्येवर पडलेल्या भीष्माचार्यांसारखी झालेली दिसते.

- जर इथल्या रहिवाश्यांना, शिवाय सह्याद्रीच्या खाली पूर्वेला आणि पश्चिमेला राहणाऱ्या कोट्यवधी जनतेला भविष्यात विस्थापित म्हणून दारोदार भटकायचं नसेल तर,

- इथल्या शेतकऱ्यांना मोलमजुरीसाठी आपल्या जमिनी सोडून, म्हाताऱ्या आणि लहान कुटुंबियांना गावी सोडून शहरांतल्या झोपडपट्टीत बकाल अवस्थेत रहायचं नसेल तर...
- स्वतःच्या हाताने पुढच्या पिढ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेण्याचं पाप शिरावर नको असेल तर...

सह्याद्रीला आणि त्यावरच्या वैशिष्ट्यपूर्ण परीसंस्थेला वाचवलच पाहिजे!